Source: Loksatta
Date: 25 April 2022 P. N. 1

## आव्हानांना झुंज देत इतरांपुढे आदर्श

# लेकीसह वसतिगृहात राहून तिने मिळवली 'आयआयएम'ची पदवी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** माणसात परिस्थितीशी संघर्ष करण्याची जिद्द असेल तर दगडालाही पाझर फुटू शकतो. अशाच प्रकारे खडतर आव्हानांना तोंड देत क्रितिका अग्रवाल या विद्यार्थिनीने आयआयएम नागपूरमधून पदव्युत्तर पदवी मिळवली. क्रितिका गर्भवती असताना तिने 'आयआयएम'मध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. प्रसूतीनंतर आपल्या इवल्याशा लेकीसह येथील वसतिगृहात राहून 'आयआयएम' सारख्या जगविख्यात संस्थेतून दोन वर्षांची पदवी प्राप्त केली.



## आव्हानांना आपली ताकद बनवा

'आयआयएम'मध्ये यशस्वीरित्या शिक्षण पूर्ण करणे सोपे नाही. मात्र, माझी मुलगी माझी ताकद होती. गर्भवती असताना शिक्षण सोडण्याचा विचारही मनात न येऊ देता त्यालाच आपली ताकद बनवून पुढे गेले. आज मिळालेल्या यशामागे कुटुंबीयांची मदत झाली, असे क्रितिकाने सांगितले. आयुष्यात पुढे जायचे असेल तर आपल्याला आव्हाने पेलावीच लागतील असा संदेशही तिने दिला.

नागपूरच्या मिहान परिसरातील भारतीय व्यवस्थापन संस्थेचा (आयआयएम) रविवारी दीक्षांत सोहळा पार पडला. त्यात क्रितिका अग्रवालला पदव्युत्तर व्यवस्थापन अभ्यासक्रमाची पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी क्रितीकाने आपल्या दोन वर्षांतील संघर्षाची कहाणी कथन केली. त्यानुसार क्रितिकाने २०२० ते २०२२ या करोनाच्या दोन वर्षांच्या काळात 'आयआयएम' नागपूरमध्ये शिक्षण घेतले. २०२० मध्ये प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. त्यावेळी ती गर्भवती होती. अशा परिस्थितीत शिक्षणाला महत्त्व द्यावे की कुटुंबाला? असा प्रश्न तिच्यासमोर निर्माण झाला होता. मात्र, तिने दोन्ही आव्हाने स्वीकारण्याचे ठरवले. यात सासर आणि माहेरच्या मंडळींनीही तिला साथ दिली. 'आयआयएम'ला प्रवेश घेतल्यावर काही महिन्यांनी *(**पान ८ वर**)*

epaper.loksatta.com